REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 4 | JANUARY - 2019

# मुस्लिम मराठी कांदबरीची वाटचाल

सौ. लता माळी
सोशल महाविद्यालय, सोलापूर.

**प्रस्तावना :-**

साहित्यात कादंबरी हा वाङ्‌मय प्रकार १५० वर्षापेक्षा अधिक जुना आहे. साहित्य ही ललित कला आहे. त्यामध्ये संगीत, शिल्प, चित्र, नृत्य, साहित्य या कलाप्रकारांचा समावेश होतो. यापैकी साहित्य ही कला शब्दांच्या माध्यमातून साकारात जाते. या साहित्य कलेचे कथा, कादंबरी, नाटक, कविता अशा प्रकारामध्ये वर्गीकरण केले जाते.

समाजजीवन हा साहित्याचा विषय असतो. साहित्यिक हा समाजातीलच एक घटक असतो. समाजातील भाषेचा प्रभाव, संस्कृतीचा प्रभाव, समाजातील चालीरिती, रूढीपंरपराचा प्रभाव त्यांच्या साहित्यावर उमटत असतो. व त्यातूनच साहित्यिकाचे साहित्य एक नवा आकार घेत असते. साहित्याचा मुख्य गाभा समाज व समाजातील भाषा हाच असतो.

सुरूवातीच्या काळात रंजनपर आणि सामाजिक राजकीय आशय असणा-या कांदबऱ्या दिसून येतात. आता मात्र कांदबरी वास्तवाकडे झुकलेली दिसून येते. याच काळात वास्ववादी, अतिवास्तववादी लिखाणही होऊ लागले. बाबा पदमनजी पासून सुरु झालेला कांदबरी हा वाङमयप्रकार वेगवेगळी वळणे घेत स्थिर झालेला दिसून येतो. कादंबरीलेखन वेगवेगळ्या विषयातून झालेले दिसून येते. ग्रामीण, दलित, भटके, आदिवासी, जैन, वीरशैव मुस्लीम प्रादेशिक सौदर्यवादी, ऐतिहासिक, चरित्रात्मक, पत्रात्मक, स्त्रीप्रधान, अशा विविध माध्यमातून कांदबरी झळकू लागली आहे. पहिल्या शंभर वर्षांत घटना व प्रसंगाचे चित्रण आले आहे.

मराठी कादंबरीच्या क्षेत्रात मुस्लीम लेखकांचे योगदान अगदीच नोंद अत्यल्प आहे. मराठी कांदबरीच्या सुरूवातीच्या शंभर वर्षामध्ये मुस्लीम कादंबरीची अगदी अपवादानेच झाली आहे. १९३० च्या सुमारास सय्यद अमीन यांच्या 'अबला' या कादंबरीचा उल्लेख आढळतो. बा. सी. मर्ढेकरांनी 'तांबडी माती' या कादंबरीत खान या स्वातंत्रसेनानीची दखल घेतलेली आहे. खान ही व्यक्तिरेखा स्वातंत्र्यासाठी झपाटलेला सैनिक म्हणून मढेकर आपल्या कादंबरीत उभी करतात. पण मुस्लीम समाजाचे जीवन ते उभे करीत नाहीत. त्याचप्रमाणे म. भा. भोसले यांनीही आपल्या 'घसरगुंडी' या कादंबरीत अकबर गुरुजींची व्यक्तिरेखा रेखाटलेली आहे. मनोहर तल्हार यांच्या माणूस या कादंबरीत हिंदू मुस्लीम या मित्राची रिक्षा ओढून जीवन जगण्याची कथा सांगितलेली आहे. माणूस मधील मुस्लीम समाजजीवनही अधिक खोलवर आहे असे मात्र म्हणता येत नाही. मुस्लीम नायकाची माणसिकता जरी अधोरेखित होत असली तरी संपूर्ण मुस्लीम समाज त्यातून वाचकांच्या समोर उभा राहतो. असे मात्र म्हणता येत नाही ?



**१९६० नंतरच्या मुस्लीम मराठी कांदबरीचे बदलते स्वरूप :-**

मराठीतील कादंबरी वाङ्मय प्रकाराची परंपरा दीडशे वर्षाहून अधिक आहे. बाबा पदमनजी यांच्या 'यमुनापर्यटन' या कादंबरीतून सुरू झालेला हा वाययीन प्रवाह वेगवेगळी वळणे घेत स्थिर होत आहे. सुरुवातीच्या काळात काहीसे रंजनपर आणि सामाजिक असे हाताळणारी ही कादंबरी गेल्या पन्नास वर्षामध्ये वास्तववादी लेखनाकडे झुकली आहे. ग्रामीण जीवनाच्या

चीत्रणाबरोबर दलित, आदिवासी, भटके असे समाज घटक कादंबरीतून आपले अस्तित्व दाखवू लागले. सुरुवातीच्या शंभर वर्षाच्या काळात कादंबरी घटना आणि प्रसंगप्रधान बनली. या कादंबरीतून मानवी भावभावना फारशा प्रकट झाल्या नाहीत. घटनाप्रसंगाबरोबर माणसातील माणूसपण पूढीलकाळात महत्त्वाचे साहित्यमूल्य मानले जाउ लागले. गेल्या वीस–पंचवीस वर्षात वेगवेगळया अंगानी मराठी कादंबरी समृध्द झालेली पाहावयास मिळते.

१९३० च्या सुमारास सय्यद अमीन यांच्या 'अबला' या कादंबरीचा उल्लेख आढळतो. साठच्या (दशकापर्यंत एकाही मुस्लीम कादंबरीकाराची नोंद आढळत नाही. याच दरम्यान हमीद दलवाई याच्या 'इधंन ने आशय, विषय आणि अभिव्यक्तीतील नाविन्य जपत या क्षेत्रात दमदार पाउल टाकले आहे. १९७० च्या सुमारास इब्राहिम खान यांची 'अंधाराचे अश्रू' (१९६९) ही कांदबरी मराठीतून प्रकाशीत झाली. त्यानंतर दीर्घ कालावधीने फ.म.शहाजिंदे यांची 'मीतू' ही (१९६४) पत्रात्मक कांदबरी आली.

राजन खान यांच्या कथात्मक साहित्याने मराठी वाङ्मयात मोलाची भर घातली आहे. कादंबरी हा विस्तृत जीवनपटाचा अरविष्कार असला तरी मुस्लीमांच्या जीवनाचे विविध स्तर आणि परिमाणे सामाजिक, माणसिक, सांस्कृतीक , तात्त्विक अशा विविध पातळ्यावरून मुस्लीमांचे जीवन मुस्लीम मराठी कादंबरीतून चित्रित होते. राजन खान यांच्या 'स्क्रीन टेस्ट' (१९८४), 'काफर' (१९८९), 'यतीम' (१९९०), 'शरियत' (१९९१), 'ह्यात आणि मजार' (१९९५), 'सत् ना गत' (१९९८), 'चिमूटभर रूढीबाज आभाळ' (१९९९), 'जातवन आणि विन्शन' (२००३),वेळू वनातील कामधेनू अशा कादंबऱ्यांची निर्मिती करून त्यांनी आपला वेगळा असा ठसा उमठविला मुस्लीम धर्मव्यवस्था जातीव्यवस्था आणि समाजव्यवस्थेचे वास्तवपूर्ण चित्रण करतानाच माणूस हा लेखकाच्या अस्थेच्या केंद्रस्थानी असायला हवा अशी भूमिका त्यांनी मांडली १९९९ च्या शब्दालय' या दिवाळी अंकातून रफिक सूरज मुल्ला या तरूण लेखकाची 'रहबर' ही कादंबरी प्रसिध्द झाली आहे. मुस्लीम समाज रूढी, परंपरा याबरोबरच मुस्लीम तरुणाच्या मानसिकतेचा प्रत्यकारी मागोवा त्यांनी आपल्या कादंबरीतून घेतला. ग्रामीण भागात आढळणारी आणि स्वतःची वैशिष्ट्ये असणारी बोली भाषा या कादंबरीत वापरली आहे. यामुळे या कादंबरीला अधिक घनता प्राप्त झाली. २००० साली शकील शेख यांची 'जुबा' ही कादंबरी प्रसिध्द झाली. रझाकर चळवळीनंतरच्या काळात मुस्लीम कुटुंबाची झालेली वाताहत यांच्यावरील अत्याचार याचे चित्रण लेखकाने या कादंबरीतून केल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्योत्तर काळात मुस्लीम समुदायाकडे पाकधारजीने व राष्ट्रद्रोही म्हणून येथील समाज व्यवस्था पाहू लागली. पण ही समाज व्यवस्था मुस्लीमांचे जनजीवन जुळवून न पाहता एकूनच खोटया प्रचारातून आपली मानसीकता बनवते. फाळणी, त्यानंतरच्या दंगली, अविश्वास आणि अनिश्चिततेचे

१९८० नंतर मुस्लीम मराठी कांदबरीची संकल्पना :

मुस्लीम मराठी कादंबरी हे मराठी साहित्यातील एक नवीन सजक पर्व आहे. आज विविध जातीधर्मातील प्रज्ञा आणि प्रतिभा आपल्य तरल संवेदनेने लिहू आणि बोलू लागलेली आहे. मराठी साहित्याने जात धर्म पंथाच्या सीमा ओलांडल्या आहेत. आपल्या मनातील भावना, संवेदना, वेदना हे माहित्यिक आपल्या कादंबरीच्या माध्यमाने प्रभावीपणे समाजाकडे मांडतात. मुस्लीम मराठी साहित्य हे एक व्यापक मानवी मूल्यांचे भान ठेवून सर्जकपणे पुढे येत आहे. मुस्लीम समाजातील प्रज्ञा आणि प्रतिमांनी आपले नाते मराठी या साहित्यप्रवाहाशी जोडलेले आहे.

स्वातंत्रोत्तर काळात मुस्लीम मराठी कादंबरीत मुस्लीम लेखकांचे महत्वपूर्ण योगदान आहे. मुस्लीम समाजजीवनाचे आणि समाजवास्तवतेचे भान ठेवून मुस्लीम मराठी साहित्यिकांनी आपले योगदान दिलेले आहे. त्यांच्या कादंबऱ्यातून वेदना, विद्रोह व नकार या जीवनमूल्यांचे विराट दर्शन होते. नव्याने शिकू लागलेला मुस्लीम वर्ग प्रथमच आपल्या लेखनातून मुस्लीम समाजातील गुतागुतीचे प्रश्न प्रखरपणे मांडू लागला आहे. १९८० नंतरच्या मुस्लीम मराठी कादंबरीची निर्मितीची प्रेरणा ही वास्तव जीवनात भेडसावणाच्या प्रश्नांशी आहे. या वास्तव जगात आपण राहतो, जगतो त्याच जीवनाचा आभास या कादंबरीने केला आहे. आपण जगत असलेल्या जीवनाचे बिंव प्रतिबिंब साहित्यात उमठविण्याचे प्रयत्न या लेखकांनी केले आहे. जीवनविषयक वास्तवतेचे भान ठेवून या साहित्यकृतीची निर्मिती झालेली आहे. जीवनातील अनेकविध स्तरावर घडणा–या घडामोडीतून त्याला जाणवलेल्या जीवनविषयक वास्तवतेचे विविध कक्षांना स्पर्श करणारे रूप या कादंबरीतून जाणवते.

मुस्लीम समाज हा येथील बहुजन समाजाचाच एक भाग आहे. आंबेडकरवादी विचारवंत बाबुराव बागुल म्हणतात, भारतीय मुस्लीम हे तुर्क, अरब, मोगल नाहीत तर ते मनुच्या अन्यायअत्याचाराविरूध्द बंड करून उठलेले बंडखोर आहेत.' मुसलमान म्हणून त्यांच्या भाव संवेदना, वेदना, हया मुस्लीमेत्तर बहुजन समाजापेक्षा वेगळ्या निश्चितच नाहीत. आज मुस्लीम समाजाचे धर्मांतरित, ग्रामीण, दलित, शोषित, कामगार सदृश्य रूप पाहावयाला मिळते. ही सर्व रूपे समजावून घेतली तर मुस्लीम समुदाय या मातीशी, या देशाशी किती आणि कसा जखडलेला आहे ते दिसून येते. मुस्लीम कादंबरीकारांनी मोठ्या आत्मविश्वासाने आपले अनुभवविश्व कादंबरीतून अभिव्यक्त केलेले दिसून येते. मराठी साहित्यात मुस्लीम मराठी साहित्य हे आज आपल्या आत्मभानासहित उभे आहे. याचा प्रत्यय त्यांच्या कादंबऱ्यातून प्रकट होताना दिसतो.

'मुस्लीम मराठी साहित्य' असा शब्दप्रयोग सर्वप्रथम सांगलीचे मुस्लीम मराठी विचारवंत सय्यद अमीन यांनी १९३६ च्या दरम्यान वापरल्याचे दिसून येते. मुस्लीम समाज हजारो वर्षापासून या देशात राहतो आहे तो या देशाच्या सुख–दुःखाचा, या देशाच्या संस्कृतीचा, इथल्या भाषिक जीवनाचा भाग झालेला आहे आणि या देशाच्या अंतरविश्वाशी रक्तबंधाचे नाते जोडूनही येथील धार्मिकव्यवस्था अजूनही त्याला परकीय दृष्टीने पाहते ही जी जाणीव आहे अत्यंत तरल जाणीव आहे. भारतातील मुस्लीम समाज हा येथील मातीशी आपले नाते सांगणार आहे. तो बहुजन समाजाचाच एक घटक आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात १९७० साली हमीद दलवाई यांनी मुस्लीम सत्यशोधक चळवळीची स्थापना केली. या चळवळीमागचा उददेश मुस्लीम समाजाचे प्रबोधन व परिवर्तन करणे हा होता. व त्याप्रमाणे त्यांनी मराठी भाषेविषयी अग्रही भूमिका घेतली. या चळवळीमुळेच मुस्लीम समाजात प्रबोधनाचे वारे वाहू लागले. मुक्या असलेल्यांना वाचा फुटली, मुस्लीम समाजातील प्रज्ञा आणि प्रतिभा नव्या जाणीव जाणीवांचा स्वीकार करू लागल्या. अनेक कालबाहय गोष्टींना त्यांनी नकार दिला. हमीद दलवाई यांच्या मुस्लीम सत्यशोधक चळवळीने मुस्लीम समाजाला नवे भान दिले. मुस्लीम समाजाला आज आपण कुठे आहोत याची त्यांना कल्पना करून दिली. त्यामुळे मुस्लीम मराठी साहित्याला एक वेगळी गती प्राप्त झाली. समाज आणि कादंबरी या दोहोंच्याही दृष्टीने ही घटना महत्त्वाची आहे. या निमित्ताने आजपर्यंत मुक असलेला मुस्लीम समाज बोलका झाला व यामुळे मुस्लीम समाजाला अज्ञात असलेली दालने उघडी झाली.

मुस्लीम समाजातील प्रज्ञा आणि प्रतिभांनी आज आधुनिकीकरण आणि परिवर्तन या प्रवाहांशी आपले नाते जोडलेले आहे. एका बाजूने परिवर्तन व आधुनिकीकरण आणि दुसऱ्या बाजूने येथील धर्मांधशक्तीने त्यांच्याकडे परकीय म्हणून हे समिश्र जीवनाची घालमेल करणारे रसायन मुस्लीम मराठी कादंबरीतून तरलपणे आज उमठत आहे. साहित्यकृती ही सौंदर्यवस्तु असून तिच्यात सौंदर्यअनुभव जागृत करण्याची शक्ती व क्षमता असते. या सौंदर्याचा प्रत्यय वाचकाने घेणे म्हणजेच त्याने साहित्यकृतीचा आस्वाद घणे होय असे ब्रोचेचे मत आहे. मुस्लीम मराठी कादंबरीतून कलेचा कस व सौंदर्याचा गौरव होताना आज दिसतो. आणि आस्वादक या सौदर्यअनुभवाचा आस्वाद घेत आहे. जीवनातील मानवहितविरोधी गोष्टींशी आपले नाते जुळणार नाही याची काळजी मुस्लीम मराठी कादंबरीने घेतलेली आहे. मुस्लीम मराठी कादंबरीत आशय, अभिव्यक्ती आणि अनुभव यांची सांगड घातलेली आहे. प्रत्यक्ष जीवनातील किंवा व्यवहारातील अनुभव साहित्यकृतीत सौदर्यरूप धारण करतात. याचा प्रत्यय १९८० नंतरच्या मुस्लीम मराठी कादंबरीत पाहावयास मिळतो.

१९८० नंतरच्या मुस्लीम मराठी साहित्याची निर्मिती ही मानवी जीवनजाणीवांचे आत्मभान ठेवूनच झालेली आहे. जीवनाचे वेद घेऊन जीवनाचे नवे तत्वज्ञान मांडण्याचे सामर्थ्य या कादंबरीत आहे. याच कादंबऱ्यातून जीवनविषयक अनुभव व्यक्त झालेला आहे. समता, सामाजिक न्याय, उज्वल मानवी प्रतिष्ठा आणि बुध्दीप्रामाण्यवाद या मानवी मूल्यांची जोपासना या कादंबऱ्यातून केलेली आहे. त्याचप्रमाणे वाचकांच्या भावनांना आव्हान करण्याचे आणि कल्पनाशक्तीला चालना देण्याचे सामर्थ्य या कादंबऱ्यातून दिसून येते. जीवनाचे मर्म उकलून दाखविण्याचे धाडस हे कांदबरीकार करीत आहेत. ''समाजाचे किंवा जीवनाचे आदर्श स्वरूप कसे असावे, माणसांचे आदर्श रूप कसे असावे आणि माणसासमधील संबंधाचे आदर्श रूप कसे असावे यासंदर्भातील अंगीकृत निष्ठा म्हणजे जीवनविषयक भूमिका होय.'' अशी जीवनविषयक भूमिका मुस्लीम मराठी कादंबरीकाराने घेतलेली आहे. धास्तावलेले मुसलमान आपली ओळख नव्याने सांगण्याचा प्रयत्न करीत होते. सामाजिक, राजकीय स्तरावरील उपेक्षेने येथील मुसलमान हतबल झालेला होता पण त्याचवेळी या समाजामध्ये शिक्षणाविषयीची जागृकता निर्माण होत होती. पगडा समाजाला वेढून राहिलेला होता. तरीही नवीन आव्हानांना सामोरे जाण्याविषयीची

जागृकता नकळतपणे आकार घेत होती. याचाच परिणाम म्हणून साहित्याच्या क्षेत्रात आपल्या भावनाचे प्रकटीकरण करण्याचा अल्पसा का असेना प्रयत्न मुस्लीम लेखक करताना दिसून येतात.

हमीद दलवाई यांच्या इंधन कादंबरीतून हिंदू-मुस्लीम समाज केंद्रस्थानी ठेवण्यात आलेला आहे. मराठी कांदबरी वाङ्मयात मुस्लीम मराठी कादंबरीचे स्थान सहारा वाळवंटातील ओयासिस आहे. सत्तरीच्या आसपास प्रसिध्द झालेली इंधन कादंबरी भालचंद्र नेमाडे यांच्या कोसला कांदबरीप्रमाणेच आशय विषय आणि कादंबरीची अभिव्यक्ती यात क्रांती घडवून आणली. म्हणून मराठी कादंबरीच्या केंद्रस्थानी माणूस ठेवला गेला. आणि घटना प्रसंगाबरोबर माणसातील माणूसपण साहित्याचे मूल्य ठरले. त्याचप्रमाणे हमीद दलवाई यांच्या 'इंधन' कादंबरीत हिंदू मुस्लीम समाज केंद्रस्थानी ठेवण्यात आला.

मुस्लीम मराठी कादंबरीत अनेक प्रश्न हाताळले गेले. हिंदू मुस्लीमांच्या दंगली सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सास्कृतीक, शैक्षणिक असे मूलभूत प्रश्न घेउन मुस्लीम मराठी कादंबरी विस्तारत गेली. मुस्लीम समाजात शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. बेकारीचा प्रश्न, पोटाची खळगी भरण्यासाठी त्यांना कराव्या लागणाच्या मार्गाचा अवलंब अशा प्रश्नांची शृंखला घेउन मुस्लीम मराठी कादंबरीकारांनी आपल्या भाव संवेदना कादंबरीच्या माध्यमातून प्रकट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपल्या समाजजीवनाचे चित्रण मुस्लीमांच्या जीवनाची दुःखाची चौकशी करण्यासाठी १९८० नंतरचा मुस्लीम मराठी कादंबरीकार पुढे सरसावू लागला.

## १९८० नंतरच्या मुस्लीम मराठी कादंबरीची परंपरा :-

मराठी कादंबरी वाङ्मयाच्या प्रमुख तीन प्रवृत्ती आहेत. असे प्रा. भालचंद्र नेमाडे यांचे मत आहे. बाबा पदुमजी यांच्या 'यमुनापर्यटन (१८५७) या कादंबरीच्या नावानेच यमुनापर्यटन प्रवृत्ती मराठी कादंबरीची पहिली प्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीत व्यक्ती आणि समाज यांच्या संबधीत प्रश्नावर कादंबरीकार आपले लक्ष्य केंद्रीत करीत असते. या प्रवृत्तीचा १९६० नंतर खूपच विस्तार झाल्याचे दिसून येते. ही प्रवृत्ती वास्तवादी समाज जाणीदा चित्रित करणारी प्रवृत्ती आहे. या यमुनापर्यटन प्रवृत्तीच्या कादंबरी वाङ्मयात सय्यद अमीन यांनी १९३० च्या सुमारास लिहीलेल्या 'अबला' कादंबरीचा समावेश करता येतो. कारण यातील स्त्री ,पूरूषप्रधान व्यवस्थेमुळे अबला झालेली आहे. हमीद दलवाई यांची 'इंधन' हीदायत खान यांची 'अंधाराचे अश्रु' (१९६९) ,राजन खान यांची 'काफर' (१९८४), रफिक सूरज यांची 'रहबर' (१९९९) आणि शकील शेख यांची 'जुबा' (२०००) या सर्व कादंब-यांचा विचार या यमुनापर्यटन प्रवृत्तीत करता येतो. कारण या मुस्लीम मराठी कादंबरी हतबल होतो. त्याच्या जीवनात उदासीनतेच्या अनेक छटा पसरू लागतात. अशा वेळी तो आपली मानसिक शांती हरवून बसतो. तेव्हा त्याला एका मार्गदर्शकाची गरज भासते. तेव्हा त्याला 'अल्ला हाच सर्वोच्च मार्गदर्शक असल्याचे जाणीव होते.

## समारोप :

प्रस्तुत प्रकरणात १९८० नंतरच्या मुस्लीम मराठी कादंबरीची पार्श्वभूमी तसेच संकल्पना पाहिली. संकल्पनेमध्ये मुस्लीम मराठी साहित्य हे व्यापक स्वरूपाचे साहित्य आहे. या साहित्याची मुहूर्त मेढ आठव्या-नवव्या शतकापासून रोवली गेली. याचे वर्णन केला आहे. त्याचप्रमाणे मुस्लीम मराठी कादंबरीच्या व्याख्या व स्वरूप यांचाही अभ्यास केले गेला. मुस्लीम मराठी कादंबरीची परंपरा लिहीत असताना आधुनिक मुस्लीम कादंबरीची परंपरा सय्यद अमीन यांच्या 'अबला' कादंबरीपासून सुरू होते. त्यांच्या विविधांगी अस्सल मराठी लेखनाने आधुनिक मुस्लीम मराठी साहित्याची परंपरा सुरू झालेली आहे हे पाहिले.

मुस्लीम मराठी कादंबरीकाराने प्रस्तापित व पांढरपेशीय कादंबरीला बगल देऊन वास्तव जीवनाचे चित्रण आपल्या कादंबरीत केलेले आहेत. प्रत्यक्ष वाटयाला येणा-या अनुभवाच्या अभिव्यक्तीसाठी कादंबरीची निवड ही त्यांनी केलेली आहे. त्यांना ज्या समस्यांना सामोरे जावे लागले याचा आढावा या कादंबरीतून घेण्यात आला आहे. कांदबरी लेखणीला प्रदीर्घ एकांताची आवश्यकता असते. पण फाळणीनंतर मुस्लीम मन, भय, संशय आणि व्देश यांच्या चरकात पिळून निघत आहे. मनस्वास्थ आणि एकांत असल्याशिवाय कादंबरीलेखन अवघड असते. तरीही मुस्लीम लेखकांनी कादंबरी लेखन केले आहे. ही कौतुकास्पद बाब आहे. कांदबरीची परंपरा आणि प्रकार पाहत असताना त्यांनी कोणकोणत्या प्रकारची कांदबरी लिहीली हे जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.